# महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक
## प्रशि. पोलीस उप निरीक्षक (सरळ सेवा) सत्र क्रमांक 111,
## अंतिम परिक्षा, जानेवारी -2015

| | | |
|---|---|---|
| पेपर क्रमांक | - 11 | एकुण गुण- 100 |
| विषय | - स्वअध्ययन [3 in 1] | वेळ - 1500 ते 1800 |
| दिनांक | - 16/01/2015 | वार - शुक्रवार |

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

सूचना :
अ. सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.
ब. प्रश्नांचे गुण त्यासमोर दर्शविले आहे.
क. वाचनीय अक्षरात उत्तरे लिहावी.
ड. फक्त निळया / काळया पेनचाच वापर करावा.
इ. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.
ई. मोबाईल फोन / पुस्तके परिक्षा कक्षात आणण्यास मनाई आहे.
उ. परिक्षा सुरु असतांना कॉपी करतांना किंवा बोलतांना आढळून आल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.
ऊ. पुरवणी उत्तरपत्रिकेवर नाव व रोल नंबर लिहू नये.

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

गुण

**प्र.1** उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगांव यांनी पूढील शैक्षणिक वर्षापासून फी वाढ करण्याचे प्रस्तावित करुन शैक्षणिक फी ची सुधारीत दरवाढ जाहीर केली. ही दरवाढ अवास्तव व अन्यायकारक असल्याने विविध विद्यार्थी संघटना, शिक्षक संघटना व इतर संघटनांनी विद्यापीठाकडे लेखी निवेदने सादर केली. प्रस्तावित फी वाढीचे निषेधार्थ विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी निदर्शने केली. यासर्व बाबी विचारात घेऊन विद्यापीठ दरवाढ कमी करेल अशी विद्यार्थी संघटनांची अपेक्षा होती. परंतु विद्यापीठाने जाहीर केलेली फी वाढ कायम असेल व त्यामध्ये कोणतीही कपात करण्यात येणार नाही असा निर्णय घेतला. विद्यापीठाचे या भुमिकेमुळे संतप्त झालेल्या सुमारे 800 ते 1000 विद्यार्थ्यांनी दुसऱ्या दिवशी विद्यापीठात एकत्र जमून, त्यातील काही विद्यार्थ्यांनी कुलगुरुंचे दालनाला घेराव घालून त्यांना बंदीस्त केले. त्यानंतर राहिलेल्या विद्यार्थ्यांनी बाहेर येऊन विद्यापीठापासून जाणाऱ्या रस्त्यावर रास्तारोको सुरु केला व त्यामुळे दोन्हीकडील वाहतूक थांबली. 12.00 वा. सुरु झालेले आंदोलन चार तासानंतरही सुरुच राहिले. उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांपैकी काही अधिकारी विद्यार्थ्यांवर लाठीचार्ज करुन त्यांना पांगवावे व रस्ता वाहतुकीस खुला करुन द्यावा या मताचे होते. तुम्ही त्या पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी आहात. . . **15**

तर -

अ. सदर आंदोलन हाताळतांना संपर्क व निर्देश याचा कसा वापर कराल?
ब. बंदोबस्ताचे नियोजन कसे कराल?
क. मिडीया संदर्भातील तुमची भुमिका स्पष्ट करा.
ड. वाहतुकी संदर्भात काय उपाययोजना कराल?
इ. बळाचा वापर करणे संदर्भात काय भुमिका घ्याल?

**प्र.2 जिल्हा पोलीस दलातील विविध विभाग व त्यांची कार्ये याची माहिती द्या.** **10**

**प्र.3 टिपा लिहा.** **15**

अ. कायदा व सुव्यवस्था हाताळतांना येणाऱ्या समस्या.
ब. पोलीस ठाणे अभिलेख.
क. राष्ट्रध्वजाचा गैरवापर व चुकीचा वापर टाळण्यासाठी घ्यावयाची खबरदारी.

**प्र.4** शहरात भद्रकाली पोलीस ठाणेचे हद्दीत पारंपारिक पध्दतीने नवरात्रीच्या कालावधीत कालीका देवीचा उत्सव दहा दिवस मोठया उत्साहात साजरा केला जातो. त्या दरम्यान खिसेकापणे, सोनसाखळी चोरणे, वाहनचोरीचे गुन्हे होत असतात. सदर यात्रेस मोठया प्रमाणात अबालवृध्दांची हजेरी असते. त्याअनुषंगाने करमणुकीच्या साधनांची मोठया प्रमाणात तिकीटावर रेलचेल असते. अशा विविध कारणांनी यात्रेस दहाही दिवस मोठया प्रमाणात गर्दी असते. तुम्ही पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी म्हणून खालील प्रश्नांवर काय उपाययोजना कराल? 15

अ] यात्रेदरम्यान खिसेकापूपासून घडणारे तसेच सोनसाखळी चोरी सारखे गुन्हे होऊ नये याबाबत कोणती उपाययोजना कराल?

ब] करमणुकीच्या साधनांजवळ होणारी गर्दी व दर्शनासाठी होणारी अबालवृध्दांची गर्दी यामध्ये कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही, याबाबत आपलेकडील उपलब्ध मनुष्यबळातून काय दक्षता घ्याल?

क] यात्रेचे स्वरुप मोठया प्रमाणात असल्याने त्या 10 दिवसांचे दरम्यान वाहनांची वर्दळ व वाहतुकीचे नियोजन कसे कराल?

**प्र.5** गजबजलेल्या शहरांमध्ये मोठमोठया कंपन्यांची स्थापना झालेल्या ठिकाणी दर्जेदार व मौल्यवान किमती वस्तु बनविण्यात येणाऱ्या कंपनीमध्ये औद्योगिक भागात रात्रीच्या घरफोडी घटनांमध्ये सराईत गुन्हेगारांनी धुमाकुळ घालून जनता व पोलीस यंत्रणेसमोर मोठे आवाहन उभे केले आहे. कंपनीतील किंमती मालाची घरफोडी / चोरी करुन, रखवालदार यास बेदम मारहाण करुन किंवा प्रसंगी खुन करुन मालाची लयलुट केली जात आहे. आपण औद्योगिक वसाहत पोलीस स्टेशनमध्ये पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी म्हणून काम करीत आहात. तर - 15

अ] कंपनीतील घरफोडी प्रतिबंध करण्यासाठी आपण काय योजना कराल?

ब] कंपनीतील घरफोडीतील गुन्हेगारांचा कशाप्रकारे शोध घेऊन गुन्हेगार जेरबंद करण्यास यशस्वी व्हाल?

क] घरफोडी झाल्याची आपल्याला खबर मिळाल्यावर आपण प्रभारी म्हणून काय कराल?

**प्र.6** **टिपा लिहा.** 15

अ] तक्रारदार किंवा फिर्यादी बरोबर पोलीसांची वर्तणूक

ब] पोलीसांनी अटक आरोपी संबंधी घ्यावयाची काळजी व आरोपीचे हक्क.

क] रेडीओ टेलीफॉनीवर बोलण्याचे इतर नियम.

**प्र.7** **पोलीस अधिकाऱ्यांसाठीची आदर्श आचारसंहिता स्पष्ट करा.** 15

***